फॅक्स क : (0712) 2253203
संकेतांक : www.msmc.gov.in

दूरध्वनी क: 2253204 ते 6
email : gmo@msmc.gov.in

MSMC

# महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

नोंदणीकृत कार्यालय : खनिकर्म भवन, प्लॉट क 7, अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर–440015

पत्र क मराखम/कोल/17/1815

दिनांकः 21 JAN 2017

## नोटिस

शासन निर्णय क.कोळसा-२०१४/प्र.क.२९/उद्योग-७ दिनांक १२ जुलै २०१६, महाराष्ट्र राज्यातील लघु व मध्यम उपक्रमांना शासन नियुक्त यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या कोळशाच्या वाटपाबाबत मार्गदर्शक तत्वेच्या मुद्दा क. ४.१ मध्ये कोळसा वितरणाच्या प्रकीयेत शासन नियुक्त यंत्रणेने अन्य Handling Agency ची नियुक्ती करु नये असे स्पष्ट निर्देश आहेत आणि महामंडळाची या निर्णयाप्रति बांधीलकी आहे व या मार्गदर्शक तत्वाशी प्रतिबद्ध राहून सदर नोटिसद्वारे समस्त उद्योग घटकांना सुचित करण्यात येत आहे की कोळसा वितरणाच्या कार्यात महामंडळाने कोणत्याही व्यक्ती/संस्था/किंवा एजेन्सीची Handling Agency म्हणून कार्य करण्याकरीता नियुक्ती केलेली नाही व भविष्यात करावयाचा विचारही नाही.

असे असूनही जर कोणती व्यक्ती/संस्था/किंवा एजेन्सी महामंडळाचे एजेन्ट म्हणून बतावणी करीत असतील तर याद्वारे सर्व उद्योग घटकांना सुचित करण्यात येते की त्यांनी अश्या कोणत्याही व्यक्ति/संस्थेसोबत कोणत्याही प्रकारचे व्यवहार करु नये. उद्योग घटकांनी काही व्यवहार केल्यास याबाबत संबधित उद्योग घटक सर्वस्वी जबाबदार राहतील याबाबत महामंडळ जबाबदार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

आदेशान्वये
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ